# प्रेसनोट

दि.०८/०२/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | लोणी पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७, |
| आरोपीचे नांव व कार्यालय | नवनाथ नामदेव निर्मल, वय-४३ वर्ष, सहायक तंत्रज्ञ (असिस्टंट लाईनमन) वर्ग-४, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादीत लोणी, ता.राहाता, जि.अहमदनगर रा.अस्तगांव रोड, पिंप्री निर्मल, ता.राहाता, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ४,५००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ४,५००/- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांनी त्यांचे आडगांव खुर्द, ता.राहाता येथील राहते घरी विद्युत जोडणी घेणेकरीता वडीलांचे नावे कोटेशन भरले होते. विद्युत जोडणी लवकर देऊन मीटर बसवुन देणे करीता यातील आरोपी लोकसेवक नवनाथ नामदेव निर्मल, सहायक तंत्रज्ञ (असिस्टंट लाईनमन), म.रा.वि.वि.कंपनी मर्यादीत लोणी-२, ता.राहाता, जि.अहमदनगर यांनी तक्रारदार यांच्या वडीलांकडे ५०००/- रुपयांची मागणी केली होती त्यामुळे तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयाकडे तक्रार दिली. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आज दि.८/२/२०२१ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आरोपी लोकसेवक निर्मल यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती ४५००/- रुपये लाचेची मागणी केली. सदरची रक्कम आज दि.८/२/२०२१ रोजी आयोजित लाचेचा सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष, हॉटेल साई छत्र, लोणी, ता.राहाता येथे स्वीकारली असता आरोपी लोकसेवक नवनाथ नामदेव निर्मल यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:- ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर